मंगळवार, दि. ७ ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ४९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## राज्यातील नगरपरिषदा व नगर पंचायतींच्या नगराध्यक्षपदांची आरक्षण सोडत

# जालन्यातील परतूर (अनु), भोकरदन (ओबीसी), अंबड (खुला) नगराध्यक्षपद महिलांसाठी राखीव

**मुंबई -** राज्यातील २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगर पंचायतींच्या नगराध्यक्ष पदांची आरक्षण सोडत आज नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत पार पडली. राज्यातील २४७ नगरपरिषदांच्या नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणाची सोडत आज काढण्यात आली. यामध्ये ३३ नगरपालिकांचं नगराध्यक्षपद अनुसूचित जाती, ११ नगरपालिकांचं नगराध्यक्षपद अनुसूचित जमाती, ओबीसी प्रवर्गाचे नगराध्यक्ष ६७ नगरपालिकांमध्ये असतील. तर खुल्या प्रवर्गाचे नगराध्यक्ष १३६ नगरपालिकांमध्ये असतील. जालना जिल्ह्यातील परतूर अनुसूचित जाती प्रवर्गातील महिलासाठी राखीव झाली असून भोकरदन ओबीसी महिला, अंबड खुला महिला प्रवर्गासाठी राखीव झाला आहे. जाहीर झालेल्या नगराध्यक्षपदाच्या आरक्षणामुळं निवडणूक प्रक्रियेला आता वेग येणार आहे.

**प्रवर्गनिहाय नगराध्यक्ष आरक्षणाची यादी**

**अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी राखीवः- ३३ नगरपालिका**

घुग्घुस (महिला), पांचगणी, अकलूज (महिला), ओझर (महिला), शिर्डी (महिला), डिगडोह (देवी) (महिला), तेल्हारा (महिला), शिरोळ (महिला), मोहोळ (महिला), भुसावळ (महिला), फुरसुंगी ऊरुळी-देवाची, वानाडोंगरी (महिला), हुपरी, शेगांव, लोणावळा, बुटीबोरी, आरमोरी, मलकापूर, जि. सातारा, नागभिड, बीड (महिला), चिमूर (महिला), चांदवड, देऊळगांवराजा (महिला), कळमेश्वर, परतूर (महिला), मैंदर्गी (महिला), अंजनगांवसूर्जी, दिग्रस (महिला), आर्णी, सेलू, सावदा (महिला), गडहिंग्लज, जळगांव जामोद,

**अनुसुचित जमाती या प्रवर्गासाठी राखीवः- ११**

नगरपालिका, पिंपळनेर (महिला), पिंपळगांव-बसवंत, भडगांव (महिला), यवतमाळ (महिला), वरुड, वणी (महिला), शेंदूरजनाघाट (महिला), राहुरी, एरंडोल, अमळनेर,
उमरी (महिला),

**नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) : ६७ नगरपालिका**

तिरोडा, वाशिम, धामणगांवरेल्वे (महिला), भोकरदन (महिला), भद्रावती, परांडा, भगूर (महिला), मालवण (महिला), नंदुरबार, खापा, वरोरा (महिला), हिंगोली (महिला), मोर्शी (महिला), शहादा, उमरेड (महिला), नवापूर, त्र्यंबक, कोपरगांव, हिवरखेड (महिला), बाळापूर (महिला), शिरुर (महिला), कुळगांव-बदलापूर (महिला), मंगरुळपीर,
कन्हान-पिंपरी, पाथर्डी, देगलूर (महिला), नेर-नबाबपूर (महिला), धाराशिव (महिला), इगतपूरी (महिला), रामटेक, माजलगांव (महिला), नशिराबाद, पालघर, मुल (महिला), वरणगांव, बल्लारपूर (महिला), मलकापूर, जि. बुलडाणा, इस्लामपूर, जुन्नर (महिला), कुडूवाडी (महिला), मोहपा, तुमसर, औसा (महिला), महाड, मुरुड-जंजिरा, (महिला), अकोट (महिला), राहता, श्रीवर्धन, विटा (महिला), ब्रम्हपूरी, दर्यापूर, चोपडा (महिला), वैजापूर, सटाणा (महिला), काटोल (महिला), गोंदिया, सांगोला, दौंड (महिला), रोहा (महिला), वर्धा, देसाईगंज (महिला), येवला, पुलगांव (महिला), कर्जत, जि. रायगड (महिला), दोंडाईचा-वरवाडे (महिला), कंधार, शिरपूर-वरवाडे.

**खुला प्रवर्ग राखीव :१३६ नगरपालिका**

परळी-वैजनाथ (महिला), मुखेड (महिला), अंबरनाथ (महिला), अचलपूर (महिला), मुदखेड (महिला), पवणी (महिला), कन्नड (महिला), मलकापूर, जि. कोल्हापूर (महिला), मोवाड (महिला), पंढरपूर (महिला), खामगांव (महिला), गंगाखेड (महिला), धरणगांव (महिला), बार्शी (महिला), अंबड (महिला), गेवराई (महिला), हसवड (महिला), गडचिरोली (महिला), भंडारा (महिला), उरण (महिला), बुलडाणा (महिला), पैठण (महिला), कारंजा (महिला), नांदुरा (महिला), सावनेर (महिला), मंगळवेढा (महिला), कळमनूरी (महिला), आर्वी (महिला), किनवट (महिला), कागल (महिला), संगमनेर (महिला), मुरगुड (महिला), साकोली (महिला), कुरुदंवाड (महिला), पुर्णा (महिला), कळंब (महिला), चांदुररेल्वे (महिला), चांदुरबाजार (महिला), भुम (महिला), रत्नागिरी (महिला), रहिमतपूर (महिला), खेड (महिला), करमाळा (महिला), वसमत (महिला), हिंगणघाट (महिला), रावेर (महिला), जामनेर (महिला), पलुस (महिला), यावल (महिला), सावंतवाडी (महिला), जव्हार (महिला), तासगांव (महिला), राजापूर (महिला), सिंधीरेल्वे (महिला), जामखेड (महिला), चाकण (महिला), शेवगांव (महिला), लोणार (महिला), हदगांव (महिला), पन्हाळा (महिला), धर्माबाद (महिला), उमरखेड (महिला), मानवत (महिला), पाचोरा (महिला), पेण (महिला), फैजपूर (महिला), उदगीर (महिला), अलीबाग (महिला), फलटण, अहमदपूर, पाथरी, चाळीसगांव, तळोदा, वाई, नांदगांव, जयसिंगपूर, निलंगा, लोहा, खोपोली, राजगुरूनगर, कराड, जेजुरी, उमरगा, आळंदी, पुसद, बारामती, जत, पारोळा, तळेगांव-दाभाडे, सासवड, गडचांदुर, रिसोड, वेंगुर्ला, पातूर, किल्लेधारुर, चिखली, मेहकर, दारव्हा, सिल्लोड, सिन्नर, देवळी, मुरूम, वडगांव, महाबळेश्वर, आष्टा, दुधणी, कुंडलवाडी, खुलताबाद, नरखेड, राजूरा, सिंदखेडराजा, वाडी, डहाणू, देवळाली प्रवरा, कामठी, अक्कलकोट, सातारा, भोर, इंदापूर, चिपळून, माथेरान, श्रीगोंदा, श्रीरामपूर, मनमाड, नळदुर्ग, भोकर, बिलोली, अंबेजोगाई, जिंतूर, सोनपेठ, गंगापूर, पांढरकवडा, घाटंजी, मुर्तीजापूर, चिखलदरा, तुळजापूर

## १३ ऑक्टोबरला पंचायत समिती सभापती पदासाठी आरक्षण सोडत

**जालना -** जालना जिल्ह्यातील आठ पंचायत समित्यामधील राखीव ठेवावयाच्या सभापती पदासाठी आरक्षण सोडत दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात काढण्यात येणार आहे. अनुसूचित जाती-१ जागा, नागरिकांचा मागास प्रवर्ग- १ जागा, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला- १ जागा, सर्वसाधारण-२ जागा, आणि सर्वसाधारण महिला -३ जागा राखीव आहेत. तरी पंचायत समिती सभापती आरक्षण सोडतीसाठी सर्व ग्रामस्थांनी हजर रहावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

युवा आदर्श

## गुलाम ...

वाचाळांची करतात
पक्षा नियुक्ती मुद्दाम
फक्त व्हावे बदनाम
कधी न मिळे छदाम
घाव घाली वर्मावरी
कळवळतो अंतर्याम
घसरतजा वळणावर
अक्षरासतत व्यायाम
शोधता नवीन विषय
मुखाला नाही विराम
जिव्हेची रे घसरगुंडी
शब्दही होतात हराम
सोडू नका कुणालाही
घायाळ करावे तमाम
पद लालसा ना कधी
कार्य करावे निष्काम
मुक्ता फळे उधळावी
कायम बोल बेलगाम
सवड नसे क्षणभरही
निवडणूकीचा हंगाम
निसटून जाई बाकीचे
स्वतांवर घ्या इल्जाम
अटक पूर्व जामिनार्थ
क्वचित करी इंतजाम
गैर होता माफी मागा
कोरडे खातात गुलाम
बदलत राही वाचाळा
पक्षश्रेष्ठी तुम्हां सलाम

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## बुद्ध विहार परिसरातील बेड कॉँक्रिटीकरण बांधकामाचे भूमिपूजन संपन्न

# सार्वजनिक विकास कार्यक्रम निधीच्या माध्यमातून शहरातील प्रत्येक वार्डात सुविधा देऊ - आ. खोतकर

**जालना -** सार्वजनिक विकास कार्यक्रम निधी अंतर्गत राहुल नगर येथील बुद्ध विहार परिसरात बेड कॉँक्रिटीकरण बांधकामाच्या कामाचे भूमिपूजन सोहळा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना स्वच्छ व सुलभ पायाभूत सुविधा उपलब्ध होणार असून, रस्त्याच्या सुधारित बांधकामामुळे वाहतुकीसाठीही मोठी सोय होणार आहे.

यावेळी सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माता रमाबाई आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

या प्रसंगी शिवसेना शहरप्रमुख विष्णु पाचफुले, विजय जाधव, संजय देटे, संजय डुकरे, शरद ढाकणे, ड. बबन मगरे, संदीप साबळे, स्वप्निल हिवराळे, सुरज बोर्डे, फकीरा गायकवाड, गंगाधर साळवे, श्याम नवगिरे, बन्सी गवई, चंद्रकांत गायकवाड, सचिन हिवाळे, मथुराताई साबळे, कमल मोरे, ज्योतीताई दांडगे, सीमाताई तुपे, मीनाताई गायकवाड, उषाबाई लहाने, सुभद्राबाई नवगिरे तसेच परिसरातील महिला भगिनी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी बोलताना आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, जनतेच्या मूलभूत गरजांची पूर्तता हा आमचा नेहमीच प्रमुख उद्देश राहिला आहे. राहुलनगर परिसरात होत असलेले हे कॉँक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना पावसाळ्यातील चिखल, धूळ आणि वाहतुकीच्या अडचणींपासून मोठा दिलासा मिळेल.

आमदार अर्जुनराव खोतकर यांनी पुढे सांगितले की,



जालना शहराच्या सर्व भागात विकासकामे गतीने सुरू आहेत. सार्वजनिक विकास कार्यक्रम निधीच्या माध्यमातून प्रत्येक वॉर्डमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे आमचे प्रयत्न सुरूच राहतील.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल स्थानिक कार्यकर्त्यांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांचे मनःपूर्वक आभार मानले आणि परिसरातील विकासकामे अधिकाधिक गतीने पूर्ण व्हावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# कृत्रिम बुद्धिमत्तेचा अविष्कार शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसेल का?

### शिक्षक मित्र वक्तृत्व स्पर्धेत स्पर्धकाचे परखड मत



**विशाल देशमुख**

**जालना -** येथील १०० शिक्षक क्लबच्या वतीने नवरात्रोत्सवाचे नऊ शैक्षणिक उपक्रम,सामाजिक बदलासाठी- एक पाऊल या उपक्रमांतर्गत विविध शालेय उपक्रम घेण्यात आले. त्यातील एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे शिक्षक मित्र वक्तृत्व स्पर्धा शालेय विद्यार्थ्यांसाठी रविवार दि. २८ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आली होती परंतु अतिवृष्टीच्या इशाऱ्यामुळे ही स्पर्धा पुढे ढकलण्यात आली होती. ती स्पर्धा दि.५ ऑक्टोबर रोजी जालना शहरातील ज्ञान संजीवनी फाउंडेशनच्या इंग्लिश स्कूलमध्ये पार पडली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ तथा शाळेचे संस्थापक डॉ.बळीराम बागल हे तर उद्घाटक म्हणून विचारवंत एम. जी. जोशी यांच्यासह डॉ. शिवनंदा मेहेत्रे, सुभाष पारे, आप्पासाहेब मुळे, विवेक कुलकर्णी व शिक्षक क्लबचे अध्यक्ष राजेभाऊ मगर यांची उपस्थिती

पान २ वर

### जालना महानगरपालिकेच्या बैठकीत नागरी प्रश्नांवर सखोल चर्चा

# प्रत्येक प्रभागात झोनल ऑफिस; दुर्गेश काठोठीवाले यांची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील वाढत्या नागरी समस्यांवर तोडगा काढण्यासाठी सोमवार (दि ६) रोजी जालना महानगरपालिकेत झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत शहर विकासाचा रोडमॅप ठरवण्यात आला. या बैठकीला खासदार डॉ. कल्याण काळे, महानगरपालिका आयुक्त संतोष खांडेकर, उपायुक्त तसेच अधिकारी यांसह अनेक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत शहरातील झोनल पद्धतीची अंमलबजावणी, रस्ते, पोल शिफ्टिंग, राजमहल - दरगाह वेस रोडवरील कामे, राजमहल ते बायपास वरील पुलांची कामे तसेच प्रभागनिहाय महापालिका कार्यालयांची उभारणी यासारख्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली.

शिवसेना (उद्धव ठाकरे) शहरप्रमुख दुर्गेश काठोठीवाले यांनी बैठकीत नागरिकांच्या समस्या थेट आयुक्तांसमोर मांडल्या. ते म्हणाले, जालना शहर वाढत असताना महापालिकेच्या प्रशासनाने जुन्या चौकटीत काम करून चालणार नाही. प्रत्येक प्रभागात झोनल ऑफिस स्थापन झाल्यास नागरिकांना फिरावे लागणार नाही; त्यांचे काम स्थानिक

पान २ वर

# संपादकीय

## भारतीय महिला संघाला विश्वविजयासाठी शुभेच्छा !

भारतीय पुरुषांच्या क्रिकेट संघाने दुबईत झालेल्या आशिया चषक स्पर्धेत अजिंक्यपद मिळवले. अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानचा धुव्वा उडवत हे अजिंक्यपद मिळवले. या विजयानंतर संपूर्ण देशात दिवाळी साजरी करण्यात आली. अजिंक्यपद मिळवूनही भारतीय संघाने पाकिस्तानच्या नक्वी यांच्याकडून चषक न स्वीकारण्याच्या निर्णय घेतल्याने मोठा वादंग झाला. हा वादंग अजूनही चालू आहे. भारताला सन्मानपूर्वक चषक प्रदान केला जाईल की नाही याकडे संपूर्ण देशाचे आणि मीडियाचे लक्ष लागले असतानाच भारतीय महिला क्रिकेटचा संघ ५० षटकांच्या म्हणजेच एकदिवसीय विश्वचषक खेळतोय आणि हा विश्वचषक भारतात होतोय हे माहीत असणाऱ्या लोकांची संख्या खूप कमी आहे आणि ते साहजिकच आहे कारण आपल्या देशात पुरुषांच्या क्रिकेट संघावर जीव ओवाळून टाकणारे जितके लोक आहेत त्याचा दहा टक्के लोक देखील महिला क्रिकेट पाहत नाही. महिला क्रिकेटला भारतात कधीच गांभीर्याने घेतले जात नाही. याला मीडियाही अपवाद नाही. मीडिया पुरुष क्रिकेटला जितकी प्रसिद्धी देतात त्याच्या दहा टक्केही प्रसिद्धी ते महिलांच्या क्रिकेटला देत नाही. महिला क्रिकेट संघाच्या सामान्यांना टीव्हीवर थेटपणे दाखवले जात नाही आता हा विश्वचषक भारतात असल्याने स्टार स्पोर्ट वाहिनीवर त्याचे थेट प्रेक्षपण चालू आहे पण सामना पाहणाऱ्यांची सख्या कमी आहे. मैदानावर देखील प्रेक्षकांची उपस्थिती कमीच असते. महिला क्रिकेट संघाला प्रयोजकही मिळत नाही असे असतानाही महिला क्रिकेटपटू मात्र आपले काम इमाने इतबारे करून देशाचा गौरव वाढवण्याचा प्रयत्न करतात. आता हेच पहा ना पुरुषांचा संघ ऑस्ट्रेलियात एकदिवसीय आणि टी २० मालिका खेळण्यासाठी जाणार आहे. या मालिकेत भारत कशी कामगिरी करतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे मात्र भारतात माहिलांचा ५० षटकांचा विश्वचषक चालू आहे त्याची मात्र कोठेच चर्चा नाही. याच विश्वचषक स्पर्धेत रविवारी भारतीय महिलांनी पाकिस्तानी महिलांचा ८८ धावांनी धुव्वा उडवला. भारतीय संघाने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा एकतर्फी पराभव करूनही महिला संघाचे कौतुक करण्यासाठी कोणी पुढे आले नाही. हेच जर पुरुषांच्या संघाने केले असते तर देशभर दिवाळी साजरी झाली असती. रस्त्यारस्त्यात लोकांनी तिरंगा हातून घेऊन विजयी यात्रा काढल्या असत्या . टीव्ही चॅनलने खेळाडूंच्या कौतुकाच्या २४ तास बातम्या दाखवल्या असत्या. वर्तमानपत्रात भारतीय खेळाडूंच्या कौतुकाचे मथळे छापून आले असते. राष्ट्रपती, पंतप्रधानांपासून सर्वांनीच भारतीय संघाचे अभिनंदन केले असते. सोशल मीडियावर संघाच्या कौतुकाचा महापूर आला असता. सर्वांनी आपल्या मोबाईलवरील स्टेटसवर संघाचे व्हिडिओ, फोटो, मिम्स ठेवले असते. सरकारने विजयी संघाला रोख पारितोषिक घोषित केले असते मात्र हीच कामगिरी महिला संघाने केली तर त्यांच्या पदरी काय येते तर उपेक्षा. त्यांच्या या कामगिरीची दखल घ्यावी असे कोणालाही वाटले नाही कारण ही कामगिरी कोणी केली तर महिलांनी. केवळ याच सामन्यात नाही तर आतापर्यंत झालेल्या सर्वच सामन्यात भारतीय संघाने विजय मिळवला आहे. भारतीय महिलांचा हा संघ बलवान संघ आहे. फलंदाजीत भारतीय संघातील महिला फॉर्मात आहे. कर्णधार हरमनप्रित कौर, स्मृती मानधना, हर्लिन देवल, जेमिना रॉड्रिग्ज, दीप्ती शर्मा, रिचा घोष हे सर्वच फलंदाज फॉर्मात आहे. यातील दोन किंवा तीन फलंदाज जरी चालले तरी भारत हा विश्वचषक जिंकू शकेल. गोलंदाजीतही क्रांती गौड, दीप्ती शर्मा, स्नेह राणा, रेणुका या जबरदस्त फॉर्मात आहे. भारताचे क्षेत्ररक्षणही चांगले आहे एकूणच यावेळी भारतीय महिलांना विश्वचषक जिंकण्याची चांगली संधी आहे. भारतीय महिलांनी आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर भारत पहिल्यांदा ५० षटकांच्या विश्वचषकावर आपले नाव कोरू शकतो. देशातील १४५ कोटी जनतेने भारताच्या या महिलांना शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले तर हा संघ देखील ऐतिहासिक कामगिरी करून भारताला विश्वचषक जिंकून देईल. भारतीय महिला संघाला विश्वविजयासाठी मनापासून शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# आरोग्य विभागाचा लहान बालकांच्या जीवाशी खेळ..!!

## आरोग्य व्यवस्थेचे पूर्णपणे बाजारीकरण, औषधी कंपन्यांचे साठे-लोटे

व्यवस्था अजूनही पूर्ण विकसित झालेली नाही हे कटूसत्य आहे. आयुष्यमान योजना कितीही प्रभावीपणे राबवली जात असली किंवा कोरोना काळात भारताने स्वतःची लस तयार करून लाखो लोकांचे प्राण वाचवले असले तरीसुद्धा कायमस्वरूपी देशातील सर्वांचे आरोग्य सुरक्षित ठेवणारी सशक्त आरोग्य व्यवस्था निर्माण झालेली नाही ही वस्तुस्थिती आहे. आजही देशाच्या अनेक भागामध्ये सरकारी आणि खाजगी रुग्णालयात प्रचंड अंदाधुंदीचा कारभार पाहायला मिळतो. खाजगी रुग्णालयांमध्ये तर रुग्णांना मिळणारी वागणूक विचित्र स्वरूपाची असते. याठिकाणी आरोग्य व्यवस्थेचे पूर्णपणे बाजारीकरण झालेले आहे. तर सरकारी रुग्णालयांमध्ये गैरव्यवस्था, गैरकारभार भ्रष्टाचार आणि प्रचंड अनास्था धुमाकुळ घालत असते. सध्या देशातल्या जवळपास सहा ते सात राज्यांमध्ये कफ सिरपच्या सेवनामुळे लहान मुलांचे मृत्यू होण्याचे प्रकार सातत्याने होत आहेत. सरकारने या घटनांची दखल घेऊनच कफ सिरप औषधावर बंदी आणली आहे. शिवाय या औषधांचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांवरही नोटीसा बजावलेल्या आहेत. ज्या पद्धतीने लहान मुलांच्या जीवाशी खेळ केला गेला आहे. तो पाहिल्यानंतर औषध कंपन्यांनी बेजबाबदारपणाचा कळस गाठल्याचेच म्हणावे लागते आणि आता अनेक लहान मुलांचे जीव गेल्यानंतर सरकारला आलेली जाग हीसुद्धा तितक्याच बेमुर्वतखोरपणाचे निदर्शक ठरते. खरे तर केंद्र आणि राज्य स्तरावर अन्न, औषध प्रशासन विभाग कार्यरत असतो. अन्न असो किंवा औषध असो या दोन्ही गोष्टी प्रत्येक व्यक्तीच्या जीवन जगण्याचा अविभाज्य भाग ठरतात. म्हणजे निर्भेळ अन्नधान्य किंवा खाण्यापिण्याच्या वस्तूंचा नियमितपणे पुरवठा व्हावा ही याच विभागाची प्रमुख जबाबदारी ठरते. औषधांच्या उत्पादनाबाबत हा विभाग अधिक कार्यक्षम असणे अपेक्षित आहे. दुर्दैवाने अन्न किंवा औषधांच्याबाबतीत भेसळ किंवा सदोष वस्तूंचा सर्रास पुरवठा होताना दिसतो आणि त्याचे वेगवेगळे परिणाम सामान्य माणसाला भोगावे लागतात.

**औषधी कंपन्यांचे साटेलोटे...**

हा प्रकार तर सरकारी स्तरावर नेहमीच पाहायला मिळतो की घटना घडून गेल्यानंतर सरकारी यंत्रणा जाग्या होतात. त्या घडूच नयेत याकरीता आवश्यक असलेली दक्षता काळजी घेतली जात नाही. आज थेट कफ सिरपसारख्या नेहमी वापरल्या जाणाऱ्या औषधावर निर्बंध आणण्याचे निर्णय घ्यावे लागतात. याचा अर्थ प्रचंड प्रमाणावर खपणाऱ्या किंवा औषधोपचारामध्ये प्रामुख्याने वापरले जाणारे कफ सिरप असेल किंवा पॅरासीटेमॉल असेल त्याच्या उत्पादन प्रक्रियेवरच कठोर लक्ष ठेवण्याची आवश्यकता आहे. औषध कंपन्यांकडून प्रत्येक बॅचच्या औषधांची अन्न औषध प्रशासनाकडून तपासणी होत नाही हीदेखील वस्तुस्थिती आहे. एकदा औषध निर्मितीचा परवाना दिल्यानंतर सगळाच आनंदीआनंद असतो. ज्या अटी नियम किंवा निकषांची औषध निर्मिती कंपन्यांनी नियमितपणे पूर्तता करायला हवी तेदेखील अनेकवेळेला होत नाही. अन्न औषध कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना खुश भारताचे उद्दीष्ट साध्य ठेवले की बाकीच्या गोष्टींची काळजी करावी लागत नाही आणि अन्न आणि औषध व्यवस्थापनेचा हाच निष्काळजीपणा रुग्णांच्या जीवाशी खेळ करणारा ठरतो.आतादेखील सरकारने कफ सिरपच्या वापराबाबत जवळपास सहा राज्यांना सावध राहण्याचा इशारा दिला आहे. हे सिरप निर्माण करणाऱ्या कंपन्यांबाबत काय ती कारवाई सरकार करेलच. परंतु अन्न औषध प्रशासनाच्या या अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष झाले किंवा ज्यांनी हा बेजबाबदारपणा केला त्यांच्याबाबतीतही सरकारने कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. कोट्यवधीची उलाढाल करणाऱ्या कंपन्यांचे केवळ आपल्या नफ्यावर लक्ष असते. आपल्या औषधांचा अधिकाधिक खप व्हावा म्हणून त्यांच्याकडून केले जाणारे अनेक प्रकारचे प्रयत्न हे गैरप्रकारांना प्रोत्साहन देणारेही असतात. खरे तर गेल्या काही वर्षात भारतीय औषध कंपन्यांनी जागतिक बाजारपेठेतही आपले वर्चस्व निर्माण केलेले आहे. भारतीय औषधांना जगातल्या अनेक देशांमधून मागणीही येत असते अशा परिस्थितीत औषधांची विश्वासार्हता कायम ठेवण्याची जबाबदारी त्यांनी पाळली पाहिजे. एकूणच कफ सिरपबाबत घडलेली ही ताजी घटना औषध कंपन्यांच्या आणि अन्न औषध प्रशासनाच्या अत्यंत बेजबाबदारपणाचेच लक्षण ठरते.

**संवेदनशीलताच संपुष्टात...**

अलिकडच्या काळात तर वैद्यकीय व्यवसायात ज्या बाजारुपणाचे थैमान पाहायला मिळते तेसुद्धा चिंताजनकच आहे. कारण या क्षेत्रात औषध निर्माते, सरकारी यंत्रणा या दोन घटकांबरोबरच डॉक्टर्स हेसुद्धा तितकेच जबाबदार ठरतात. अनेक ठिकाणी रुग्णांच्या माथी अनावश्यक औषधे मारली जातात. डॉक्टर मंडळींकडून अशी कितीतरी औषधे आहेत की त्याची आवश्यकता नसताना रुग्णांना आणायला सांगितली जातात. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे औषध कंपन्यांकडून डॉक्टरांना अनेक प्रकारची आमिषे दाखवली जातात. कट प्रॅक्टीस हा तर यातला एक भाग झाला. परंतु वर्षभरातून डॉक्टरांना गिफ्टस देत राहणे, काही मोठ्या कंपन्यांमधून डॉक्टरांच्या परदेशवाऱ्याही आयोजित केल्या जातात. याचा अर्थ ही औषधे आजारावर दिली जात नाहीत. तर त्याचा बाजार वाढवण्याचाच नियोजनबद्ध प्रयत्न चाललेला असतो. अनेक रुग्णांच्याबाबतीत अँटिबायोटिक्स औषधांच्या माऱ्यामुळे दुष्परिणाम पाहायला मिळाले आहेत. जी संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रात विश्वासार्हता आणि संवेदनशीलता महत्त्वाची असते. त्यालाच हद्दपार केले जाते आहे. पैसा कमावण्याच्या अतिरेकी हव्यासाचे जे काही भयानक दुष्परिणाम आहेत. तेही वाढू लागलेले आहेत. केंद्र सरकारने राज्य सरकारला केवळ सूचना देऊन आपली जबाबदारी झटकता येणार नाही. सर्व राज्यांमधल्या औषधनिर्मितीसंबंधात अधिक काळजी घेण्यांसदर्भात आपली कार्यपद्धती कठोर करावी लागेल. ज्यासाठी अन्न आणि औषध प्रशासन विभाग निर्माण केला आहे. तिथे असणारे दोष संपवावे लागतील. विशेषतः वाढता भ्रष्टाचार संपुष्टात आणावा लागेल तरच रुग्णांच्या जीवाशी केला जाणारा हा खेळ थांबू शकेल.

# बदलत्या काळात सायकलचे ते सुवर्ण दिवस कधी येतील?

एकेकाळी सायकलला खूप महत्त्व होते. प्रत्येक जण सायकलला जिवापाड जपायचा व सायकलवर अतोनात प्रेम करायचा. रोज सकाळी सायकल ला धुवून सायकलची अगरबत्ती लावून पूजा करायचा. स्वच्छ पाण्याने धुऊन घेतल्यावर सायकलला ऑइलिंग करायचा. दररोज सकाळी उठल्यावर सायकलवर बारकाईने नजर फिरवायचा. सायकलला जर धक्का लागला तर त्याच्या मनाला खूप वेदना व्हायच्या. म्हणजे सायकल ही माणसाच्या जीवनाशी खूप निगडित व संबंधित होती. सायकल माणसाचा अविभाज्य घटक बनली होती. माणूस जेवढे आपल्या मुलाबाळांवर व घरच्या सदस्यांवर प्रेम करायचा, तेवढेच प्रेम व माया माणूस सायकल वर सुद्धा करायचा. लहान मुले सायकलला मनोरंजनाचे व खेळण्याचे साधन म्हणून तिचा उपयोग करायचे. तत्कालीन घरोघरी मोटारसायकल कमी आणि सायकल जास्त असायच्या. त्याकाळी माणसे आळशी व उंटावर बसून शेळ्या हाकणारी नव्हती. दोन्ही पायांना ताण देऊन व पायाची कसरत करून सायकल चालवायचा आणि आपल्या शरीराची हालचाल व व्यायाम व्हावा म्हणून मोटार सायकल पेक्षा सायकलला अधिक महत्त्व द्यायचा. त्याकाळी शिक्षक, पोस्टमॅन, तलाठी व ग्रामसेवक हे गावापासून काही अंतरावर म्हणजेच जवळच असायचे आणि आपल्या ड्युटीवर यायचे म्हटल्यावर सायकलच्या माध्यमातून प्रवास करून आपले ठिकाण गाठायचे. आजही काही शिक्षक सायकलच्या माध्यमातून प्रवास करतात आणि आपली शाळा गाठतात. त्यांच्याकडे मोटार सायकल घ्यायला किंवा चार चाकी घ्यायला पैसे भरपूर आहेत परंतु सायकलने अपडाऊन करणे म्हणजे शरीराचा व्यायाम करणे असे त्यांना वाटायचे. म्हणून सायकलचा वापर एक दहा वर्षांपूर्वी प्रत्येक जण करायचा. शेताला जाण्यासाठी, जवळपासच्या गावखेड्याला जाण्यासाठी, शाळेला जाण्यासाठी, फिरायला जाण्यासाठी, तिच्यावर पाणी भरण्यासाठी किंवा तिच्यावर ओझे वाहण्यासाठी आणि काहीजण आपला विविध व्यवसाय करण्यासाठी सायकलचा पुरेपूर वापर करायचे. मित्रांनो यावरून आपल्याला कळत असेल की खरंच, सायकलचे आणि आपले संबंध किती अतूट होते ते? सायकलचे मोल आपल्या जीवनात किती लाखमोलाचे होते ते? सायकलची आणि आपली नाळ कशी मजबूत व घट्ट होती ते? माणूस लहान असो की, मोठा परंतु सायकलचा दिवसभरात एक तरी फेरा मारल्याशिवाय त्याच्या मनाला चैन पडायचा नाही. लहान मुले, युवक व मोठी माणसे सुद्धा सायकलवर ऐटीत व दिमाखाने बसून गाव पिंजून काढायचे. रोज सकाळी पहाटे उठून पाच दहा किलोमीटर सायकलवर फेरा मारायचे. दुष्काळात व कडक उन्हाळ्यात मात्र सायकलचे महत्व प्रत्येकाला कळायचे. मी आतापर्यंत दोन-तीन भीषण दुष्काळ बघितले आहेत. पाण्यासाठी लोकांना किती वनवन भटकावे लागायचे, पाणी भरताना किती संघर्ष करावा लागायचा, गुरे ढोरे पाण्या वाचून कसे तडफडायचे, दाही दिशा पाण्यासाठी वनवन भटकताना बायाबापड्यांचा जीव कासावीस व्हायचा. गावात हातपंपाला पाणी यायचे नाही, काही जणांचे बोर आटलेले असायचे, काही जणांच्या विहिरी कोरड्याठाक पडलेल्या असायच्या तेव्हा मात्र पाण्यासाठी लोकांना वणवण भटकावे लागायचे. शेजारच्या गावावरून किंवा शेतातील विहिरीतून सायकलच्या साह्याने पाणी भरावे लागायचे. तेव्हा सायकल फार महत्त्वाची वाटायची. सायकलवर एकदाच दहा दहा पाण्याचे हांडे आकड्याच्या साह्याने अडकून आणले जायचे. सायकलमुळे माणसाचा ताण व बेजारी कमी व्हायची. सायकलमुळे पाणी भरायला कितीही लांबून आणायचे झाले तरी काही वाटायचे नाही. एका खेपेला आठ ते दहा हांडे आरामात सायकलवर यायचे. अशा दोन खेपी केल्या की पाणी भरणे जलद व्हायचे. यामुळे सायकलचे महत्त्व तेव्हा खूप होते. आणि आजही आहे. कारण एक दोन वर्षांपूर्वी दुष्काळात माणसाच्या वाट्याला पाण्यासाठी वनवन भटकायची वेळ आली होती. तेव्हा बरीच माणसे अगदी सहजपणे सायकलच्या साह्याने पाणी भरून थंडगार बसायची. परंतु खेदाची बाब अशी की, आजकाल प्रत्येक घराघरात प्रत्येक सदस्याला वेगळ्या कॉलिटीची मोटारसायकल आहे, ज्या घरात मोटारसायकल नाही असे घर क्वचितच बघायला मिळेल. म्हणजे आजकाल सायकल प्रेमी कमी आणि मोटार सायकल प्रेमी जास्त झाले आहेत. विचार केल्यावर माणसाला जीवनात जेवढे मोटारसायकलचे महत्त्व आहे, तेवढेच सायकलचे देखील आहे. लोकांनी घरातील सायकली भंगारच्या भावात विकून टाकल्या आहेत. जेव्हा दुष्काळ पडतो, पेट्रोलचा भाव गगनाला भिडतो आणि वजन व मोटापा वाढतो, तेव्हा मात्र आपल्याला नक्कीच सायकलची आठवण होते. सायकलचे आपल्या जीवनातील महत्त्व कळते. शेताकडे जाण्यासाठी, शाळेला जाण्यासाठी, बस स्टॅन्डला फेरफटका मारण्यासाठी, जवळपास भाजी मंडीत भाजी खरेदीसाठी किंवा इतर काही कामानिमित्त म्हणा जवळपास जायचे झाले तर माणूस मोटारसायकलचाच वापर करत आहे. म्हणूनच आजकाल माणसाच्या शरीराला व्यायाम राहिला नाही. आजकालचा माणूस कोणत्या ना कोणत्या आजाराने ग्रस्त आहे. कारण शरीराची हालचाल होत नसल्यामुळे वजन व शरीर वाढत आहे. आणि वजन व शरीर वाढल्यामुळे माणूस विविध आजारांच्या विळख्यात ओढला जात आहे. म्हणूनच आजकालची माणसे कमी वयातच जगाचा निरोप घेत आहेत. मला सांगायचा मुद्दा असा आहे की, आजकालच्या लोकांना सायकलवर फिरणे म्हणजे अपमान वाटत आहे. कमीपणाचे लक्षण वाटत आहे. आणि मोटरसायकलवर फिरणे म्हणजे प्रतिष्ठेचे लक्षण वाटत आहे. अशा मानापानाला हापापलेली माणसे खूप काळ टिकत नसतात. जरा अलीकडच्या काळात माणसांचा दिवसभराचा वावर हा सायकलवर व्हायचा. माणूस कुठेही जायचे झाले तर सायकलवर जात होता. त्यामुळे माणसाच्या पूर्ण शरीराची हालचाल व्हायची. माणसाच्या शरीराची चांगली कसरत व्हायची म्हणून तेव्हाचा माणूस तंदुरुस्त व धष्टपुष्ट होता. दीर्घायुष्य जगायचा, रोगमुक्त राहायचा आणि शंभरी ओलांडायचा परंतु आत्ताचा माणूस हा अल्पावधीतच जगाचा निरोप घेत आहे. माणसांनो, जाता जाता तुम्हाला कळकळीची नम्र प्रार्थना करतो की, चार-पाच किलोमीटरसाठी मोटार सायकलवर मिरवण्यापेक्षा सायकलवर वावर करा... कुठेही पायी जाण्यापेक्षा व मोटरसायकलवर जाण्यापेक्षा सायकलने जा... कारण सायकलचे महत्त्व आपल्या जीवनात लाखमोलाचे आहे. हल्ली बरेच विद्यार्थी व शिक्षक शाळेला अपडाऊन करण्यासाठी सायकलचा वापर करतात. ज्यांना ज्यांना सायकलचे महत्त्व माहित आहे. तो व्यक्ती जवळपास फेरफटका मारायचा झाला तर सायकलवरच मारतो. माझे चुलत आजोबा अशोक आप्पाराव कांबळे यांना शासनाची नोकरी असून सुद्धा ते कोणताच मोठेपणा न मिरवता आज रिटायर होऊन सुद्धा सायकलवरच ये जा करतात. सायकलवरच शेताला जाणे, सायकलवरच कुठे ही फेरफटका मारणे, पाच किलोमीटरचा अंतर ते लीलया सायकलवरच पार करतात. त्यांच्याकडे पैसा नाही का? त्यांनाही मोटारसायकलवर फिरता येत नाही का? परंतु त्यांना सायकलवर फिरताना कोणताच संकोच वाटत नाही. ते बिनधास्तपणे आणि मनसोक्तपणे सायकलवर फिरतात. आमच्या खंडाळी गावात ते एकमेव सायकलस्वार आहेत जे की, सायकलवर अगदी म्हातारपणात देखील फेरफटका मारतात. सायकलचा वापर करून शरीराला हालचाल करण्यास भाग पाडतात. आपण सर्वांनी एक निश्चय करूया की, चार ते पाच किलोमीटर अंतर मोटार सायकलवर पार न करता सायकलवर करावा...गावातल्या गावात आणि गावाच्या बाहेर चार ते पाच किलोमीटर अंतरापर्यंत कोणत्याच वाहनाचा वापर न करता सायकलचा वापर करणे अनिवार्य करून ठेवावे, तरच वायु प्रदूषण सुद्धा होणार नाही आणि माणूस आजारी देखील पडणार नाही.माझ्या आठवणीतील व माझ्या दृष्टिकोनातील सायकल म्हणजेच माझे सायकलवर असणारे प्रेम व सायकल विचार आपण सर्वांनी आत्मसात करून सायकलचे ते मावळलेले सुवर्ण दिवस पुन्हा आणुया आणि जीवनाची पुढील वाटचाल सायकलवरच करूया... सायकल तुला माझा मनःपूर्वक सलाम!

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे, खंडाळी ता अहमदपूर जिल्हा लातूर मो.७४९८७१५६६१.**

पान १ वरुन

## कृत्रिम बुद्धीमत्तेचा ...

होती. तत्पूर्वी दीप प्रज्वलाने कार्यक्रमाची मान्यवरांच्या हस्ते सुरुवात करण्यात आली व या वर्षीचा राज्य शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार जालना येथील आदर्श शिक्षक विवेक कुलकर्णी यांना मिळाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. व स्पर्धेच्या अनुषंगाने उपस्थित पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.

शिक्षक मित्र वक्तृत्व स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला होता. या स्पर्धेसाठी ४० शाळातील ७६ विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी केली होती. यापैकी प्रत्यक्ष स्पर्धेसाठी ३५ शाळातील ६४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता नव्या युगाचा आविष्कार, छत्रपती शिवाजी महाराजांचे गड किल्ले - एक ऐतिहासिक वारसा, माझं शहर माझी जबाबदारी, भारतीय सण उत्सव एकात्मतेचे प्रतिक व विद्यार्थी विकासात शिक्षणाचे महत्त्व या विषयावर वरील सहभागी विद्यार्थ्यांनी आपापले परखड व अभ्यासपूर्ण मते मांडून परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. यात प्रामुख्याने कृत्रिम बुद्धिमत्ता शेतकऱ्यांचे अश्रू पुसेल का ? या प्रश्नाने उपस्थितीतांचे डोळे पाणावले तर भारतीय सण उत्सवाच्या माध्यमातून वाढत चाललेली सामाजिक दरी कमी होईल का वा छत्रपती शिवाजी महाराजांनी मोठ्या ताकतीने निर्माण केलेले स्वराज्य व त्या स्वराज्याची साक्ष व महती सांगणारे गडकिल्ले जतन संवर्धनात प्रत्येक नागरिकांनी योगदान द्यावे असे मुद्दे मांडले.वक्तृत्व स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षण करण्यासाठी परीक्षक म्हणून डॉ.शिवनंदा मेहेत्रे,प्रा. डॉ.यास्मिन शेख, प्रा. चंद्रकांत धोत्रे, साजिद खान पठाण,प्रा. विलास गुजर व नारायण राजेभोसले यांची उपस्थिती होती. सहभागी झालेल्या व वक्तृत्व स्पर्धा निकष पात्र ठरवून विजयी झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे होत माध्यमिक विभाग,प्रथम क्रमांक सायली रवींद्र जोगदंड (सी.टी.एम.के. विद्यालय, जालना) द्वितीय क्रमांक विभागून वीरेंद्र बाळासाहेब कासारे (पी.एम. श्री जि. प. प्रशाला, नेर) व प्राची योगेश गडकर ( जे.बी.के. विद्यालय, टेंभुर्णी ) तृतीय क्रमांक ऋतुजा निवृत्ती भोंडे (पद्मभूषण बारवाले प्राथमिक विद्यालय, मांडवा ) तर उत्तेजनार्थ दिव्या हर्षवर्धन वाहुळकर ( कै. बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालय, जालना ) आणि

प्राथमिक विभागातून प्रथम क्रमांक विभागून स्वराज ज्ञानेश्वर उखर्डे ( रामानुज इंग्लिश स्कूल, टेंभुर्णी ) व सई शिवाजी डोंगरे ( राजुरेश्वर विद्यालय, कर्जत ) द्वितीय क्रमांक : आस्था अंकुश ढसाळ ( शांतिनिकेतन विद्यामंदिर, जालना) तृतीय क्रमांक : गायत्री बाबासाहेब मदन (कै. नानासाहेब पाटील विद्यालय, नजीक पांगरी) तर उत्तेजनार्थ : शिवानी दिलीप पारखे ( प्रतिभा विद्यालय, काजळा)

कार्यक्रमाचे बहारदार संचलन साजिद पठाण यांनी तर आभार संदीप इंगोले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संदीप इंगोले, अशोक माधवले, मंदाकिनी खलसे, रामेश्वर धोपटे लक्ष्मण कुऱ्हाडे व राजेभाऊ मगर यांनी परिश्रम घेतले.

## प्रत्येक प्रभागात ....

पातळीवरच पूर्ण होईल. तसेच राजमहल-दरगाह वेस रोडवरील पोल शिफ्टिंग आणि अपूर्ण रस्त्यांच्या कामांकडे तातडीने लक्ष द्यावे. तसेच राजमहल ते बायपासकडे जाणारा पुल गेल्या पावसामुळे खचला आहे तो पुल तातडीने नव्याने बांधण्यात यावा. काठोठीवाले यांनी हेही अधोरेखित केले की, महापालिकेचा कारभार जनतेच्या हिताचा आणि नागरिकांसाठी सुलभ व्हावा, हीच अपेक्षा आहे.

बैठकीदरम्यान महापालिका आयुक्त संतोष खांडेकर यांनी शहरप्रमुख काठोठीवाले यांच्या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेतली. त्यांनी सांगितले की, महापालिका प्रशासन नागरिकांच्या मूलभूत गरजांवर प्राधान्याने काम करत आहे. नागरिकांच्या तक्रारी जलदगतीने सोडवण्यासाठी एक 'हेल्पलाइन नंबर' सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच प्रत्येक महिन्याच्या अखेरच्या सोमवारी तक्रारनिवारण दिन आयोजित केला जाईल, ज्यामध्ये सर्व प्रलंबित तक्रारींचे निराकरण केले जाईल.

बैठकीत शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन, रस्ते सुधारणा, सार्वजनिक दिवे आणि वाहतूक नियोजन या प्रमुख विषयांवर सखोल चर्चा झाली. खासदारांनीही या वेळी महापालिकेला स्पष्ट निर्देश दिले की, शहर विकासाच्या प्रत्येक योजनेत नागरिकांचा सहभाग असावा आणि कामे वेळेत पूर्ण झाली पाहिजेत. या बैठकीत पक्षीय राजकारण बाजूला ठेवून सर्वांनी 'जालना शहराचा सर्वांगीण विकास' हे ध्येय मांडले. शहरातील प्रमुख विकास आराखड्यांवर अमल करण्यासाठी लवकरच महापालिकेकडून विशेष समिती गठीत केली जाणार आहे.

या बैठकीतून हे स्पष्ट झाले की जालना शहराच्या विकासासाठी राजकीय इच्छाशक्ती आणि प्रशासनिक तत्परता दोन्ही आवश्यक आहेत. महानगरपालिकेने तक्रारनिवारण प्रणाली आणि झोनल पद्धत प्रभावीपणे राबवली, तर नागरिकांना थेट फायद्याचा लाभ होईल.

शहरप्रमुख दुर्गेश काठोठीवाले यांची मागणी आणि आयुक्त खांडेकर यांची सकारात्मक भूमिका दोन्ही मिळून जालना शहराला सुशोभित, सुव्यवस्थित आणि नागरिककेंद्रित बनवण्याची दिशा देत आहेत.

# मराठवाड्यातील अतिवृष्टीने बाधीत शेतकऱ्यांना मदतीची मागणी करणाऱ्या हंबरडा मोर्चात हजारोंच्या संख्येने सहभागी व्हा - विरोधी पक्षनेते अंबादास दानवे

**जालना । प्रतिनिधी -** मराठवाड्यातील अतिवृष्टीने बाधीत शेतकऱ्यांना मदतीची मागणीसाठी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयावर हंबरडा मोर्चा काढण्यात येणार असून या मोर्चात हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केले आहे. मागील अनेक दिवसात मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यात प्रचंड मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली. त्यामुळे मराठवाड्यातील शेतकरी अत्यंत हातबल झाला आहे. अशा प्रचंड बिकट परिस्थितीत शासनाच्या वतीने केवळ पाहणी दौरे आयोजित करण्यात येत असून आजपर्यंत शेतकर्याला प्रत्यक्ष कवडीचीही मदत झालेली नाही. या अतिवृष्टीग्रस्त शेतकर्यांना शासनाकडून प्रती हेक्टरी ५० हजार रुपये मदत मिळावी, शेतकर्यांना सरसकट कर्जमुक्त करावे. आपत्तीग्रस्त भागातील पशुधन व पडलेली घरे यांनाही मदत करावी या मागण्या करिता मराठवाड्यातील शेतकरी रस्त्यावर उतरून छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयावर हंबरडा मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाचे नेतृत्व शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे करणार आहेत.

करीता या मोर्चात हजारोच्या संख्येने जालना जिल्ह्यातील शेतकर्यांनी सहभागी व्हावे. असे आवाहन राज्याच्या विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी रविवार जालना येथील शिवसेना भवन येथे आयोजित पदाधिकार्यांच्या बैठकीत केले. यावेळी व्यासपीठावर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, जिल्हाप्रमुख महेश नळगे, भानुदास घुगे, रमेश गव्हाड, भगवानराव कदम, मुरलीधर शेजुळ, मनीष श्रीवास्तव, हनुमान धांडे, देवनाथ जाधव, मुरलीधर थेटे, शहर प्रमुख बाला परदेशी, दुर्गेश काठोठीवाले, दीपक रननवरे, महिला आघाडीच्या संघटक मंगल मेटकर, गंगूताई वानखेडे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना अंबादास दानवे म्हणाले की, राज्यातील शेतकरी अत्यंत अडचणीत असतानाही राज्य शासन त्याला कोणतीही मदत करण्याची ठोस भूमिका घेतांना दिसत नाही. केवळ कोरडी आश्वासने देऊन व शब्दांचे फवारे उडवून चालणार नाही. त्यामुळे अशा या सरकारला ताळ्यावर आणण्यासाठी व शेतकर्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आयोजित केलेल्या हंबरडा मोर्चास जिल्ह्यातील शेतकर्यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केले. यावेळी बोलतांना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, जालना जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्ष सत्तेत नसतानाही केवळ पाहणी करणे, फोटो काढणे असे कार्यक्रम न करता पक्षाने नागरिकांना अल्प स्वरूपात का होईना परंतु थेट मदत देण्याचा प्रयत्न केला. अनेक नागरीवस्त्या झोपडपट्ट्यांत पाणी घुसले नागरिकांना मदत करणे आपले कर्तव्य असते. गोदाकाठच्या गावातही पूरपरिस्थितीत अत्यंत धडाडीने नागरिकांना मदत व सहाय्य केले. सर्व शेतकर्यांना मोठ्या प्रमाणावर मदत मिळावी यासाठी येत्या येत्या ११ ऑक्टोबर रोजी जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालया समोर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने शेतकर्यांना




तेव्हा तेथील नागरिकांना पुरी भाजी, खिचडी, अन्नधान्याच्या किट अशी मदत करून नागरिकांना धीर देण्याचे काम केले. आपत्ती कोणतीही असो त्यात सर्वात अगोदर मदत शिवसेनेच्या वतीनेच करण्यात येते. अशा विपत्तीत मदत करण्यात सर्वात पुढे शिवसैनिकच होते. परतुर तालुक्यातील आष्टी, गोळेगाव व लोणी परसरात प्रचंड मोठ्या प्रमाणात गावात घुसलेल्या पाण्याने हाहाकार माजवला होता. तिथेही शिवसैनिकांनी मोठ्या प्रमाणावर नागरिकांना छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित केलेल्या हंबरडा मोर्चात सर्व तालुक्यातील पदाधिकार्यांनी हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे. असे आवाहन जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी केले. तसेच येत्या ०८ तारखेलाही तात्काळ मदत मिळावी याकरिता निदर्शने करण्यात येणार आहेत. जालना तालुक्याच्या वतीने येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे धरून निदर्शने करण्यात येणार असल्याचेही शिवसेना जिल्हाप्रमुख अंबेकर यांनी सांगुण दोन्ही आंदोलनात शेतकर्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी तालुकाप्रमुख हरिहर शिंदे, जयप्रकाश चव्हाण, कैलास पुंगळे, कुंडलिक मूठ्ठे, पंडित गावडे, दिनेश काकडे, कुमार रुपवते, संदीप कंटुले, गणेश काळे,आबा कदम,भारत पंडित, मधुकर खरात यांच्यासह उपतालुकाप्रमुख प्रभाकर उगले, प्रभाकर घडलिंग, जि.प. प. सदस्य बबनराव खरात, यांच्यासह अनंता वैद्य, आबा कदम, बाबुराव कायंदे, पंडितराव क्षीरसागर,अजय रोडिया, माऊली गोरे, संदीप झारकंडे, जनार्दन गिराम, दर्शन चौधरी, बबनराव मिसाळ, सुरेश वाघमारे, कुमार रुपवते, दत्ता सुरुंग, काकासाहेब वैद्य, संदीप पाचारे, प्रभाकर खंदारे, संतोष क्षत्रिय, अनिल अंभोरे, जीवन खंडागळे, गणेश लाहोटी, सखावत पठाण, वसीम पठाण, रामेश्वर कुरिल यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकार्यांची उपस्थिती होती.

# शेतकऱ्यांना महाविस्तार एआय ॲप ठरणार माहितीदूत

**जालना । प्रतिनिधी -** शेतकऱ्यांना हवामान बदल बाजारपेठेतील अस्थिरता, आणि माहितीच्या अभावामुळे अनेक आव्हांनांचा सामना करावा लागतो. यावर उपाय म्हणून महाविस्तार ए.आय. हे अँप तयार केले आहे. हे कृषी विभागाने विकसित केलेले एक अत्याधुनिक प आहे. कृत्रिम बुद्धिमतेच्या सहाय्याने हे अँप शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीशी संबंधित सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी एकाच ठिकाणी माहिती उपलब्ध करून देते. मराठी भाषेत उपलब्ध असलेले हे अँप शेतकऱ्यांना रिअल टाइम माहिती, तज्ज्ञांचा सल्ला आणि आधुनिक शेती पध्दतींचे मार्गदर्शन करते. तरी शेतकऱ्यांनी या ॲपचा जास्तीत जास्त वापर करून डिजीटल शेतीकडे वाटचाल करावी आणि आपली शेती अधिक नफा देणारी बनवावी. शेतकऱ्यांनी गुगल प्ले स्टोअरवर जाऊन आजच महाविस्तार एआय प डाउनलोड करुन शेतीच्या डिजीटल क्रांतीचा भाग व्हावे. महाविस्तार एआय अँपमधील एआय चॅटबॉट शेतकऱ्यांच्या प्रश्नांना त्वरित उत्तरे देते. रिअल-टाइम हवामान अंदाज, स्थानिक पातळीवरील हवामान अंदाजामुळे शेतकरी पेरणी, कापणी आणि खतांचा वापर यांचे नियोजन करू शकतात. स्थानिक आणि राष्ट्रीय बाजारपेठेतील पिकांचे भाव रिअल-टाइममध्ये दाखवते. कृषि विभागाच्या विविध कृषी योजनांची माहिती, अनुदान, आणि विमा योजनांचे तपशील एकाच ठिकाणी मिळू शकतील. पमध्ये मराठीत व्हिडीओ उपलब्ध आहेत. ज्यात पिकांची लागवड, खतांचा वापर, कापणी, आणि जैविक शेती याबाबत तपशीलवार मार्गदर्शन मिळेल. अँपमधील एआय तंत्रज्ञानामध्ये शेतकरी पिकांचे फोटो अपलोड करून पिकांवरील रोग आणि किडींचे निदान करुन उपाय मिळवू शकतात. महाविस्तार एआय प शेतकऱ्यांचे जीवन सुसह्य बनवण्यासाठी अनेक फायदे घेऊन आले आहेत. चुकीच्या खतांचा किंवा किटकनाशकांचा वापर टाळून शेतकरी उत्पादन खर्च कमी करू शकतात. बाजारभाव माहिती आणि हवामान अंदाजामुळे शेतकरी योग्यवेळी पिकांची विक्री आणि नियोजन करू शकतात. यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते. असेही कृषी विभागाकडून सांगण्यात आले आहे.

# शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये अल्पमुदतीच्या ७ अभ्यासक्रमाचे उदघाटन

**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील हुतात्मा जनार्धन मामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये अल्पमुदतीचे ७ अभ्यासक्रम दि.८ ऑक्टोबर २०२५ पासून सुरु होत आहेत. या कार्यक्रमाचा ऑनलाईन उदघाटन समारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शुभ हस्ते तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत दि.८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता मुंबई येथे होणार आहे.

जालना येथील आयटीआयमध्ये ब्युटी थेरिपिस्ट, टेक्निशियन एअर कंडीशनर, सोलर पॅनल इन्स्टॉलेंशन टेक्निशियन, ड्रोन सर्व्हिस टेक्निशियन, मोबाईल रिपेअरिंग, एलईडी लाईट रिपेअरिंग, डिजीटल मित्र हे अल्पमुदतीचे अभ्यासक्रम सुरु होत आहेत. अभ्यासक्रमासाठी इयत्ता आठवी, दहावी, आयटीआय उत्तीर्ण ही अर्हता ठेवण्यात आली आहे. असे उपप्राचार्य, हुतात्मा जनार्धन मामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.



# कोजागिरी पौर्णिमा हा सण एकात्मता, स्नेह आणि भक्तीचा संदेश देणारा - आमदार बबनराव लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** श्री आई जगदंबेच्या कृपेने परतूर शहरात कोजागिरी पौर्णिमेनिमित्त महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जय अंबे निजी निवास, काळे गल्ली येथे दुपारी दोन वाजता सुरू झालेला हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने संपन्न झाला. या प्रसंगी माजी मंत्री व परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थित राहून देवी जगदंबा आईची महाआरती केली. महाआरतीच्या वेळी परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले.

भाविकांनी देवीचे दर्शन घेऊन आशीर्वाद प्राप्त केला. आमदार लोणीकर यांनी या प्रसंगी उपस्थित भाविक भक्तांना मार्गदर्शन केले व कोजागिरी पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले की, कोजागिरी पौर्णिमा हा सण एकात्मता, स्नेह आणि भक्तीचा संदेश देणारा आहे. अशा धार्मिक व सांस्कृतिक परंपरा समाजातील बंधुता अधिक दृढ करतात. या कार्यक्रमासाठी परतूर शहर व परिसरातून मोठ्या संख्येने नागरिक, महिला, युवक-युवती, ज्येष्ठ मंडळी तसेच भारतीय जनता पक्षाचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. समाजातील सर्व घटक एकत्र येऊन श्रद्धा, भक्ती आणि स्नेहभावनेतून हा सोहळा पार पडला. महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी आलेल्या नागरिकांनी आयोजक डी. बी. काळे यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. कार्यक्रम अत्यंत शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीपणे पार पडला.



या वेळी भाजपा तालुका अध्यक्ष शत्रूघ्न कणसे, प्रवीण सातोणकर, संदीप बाहेकर, प्रकाश चव्हाण, तुकाराम सोळंके, मधुकर मोरे, सावता काळे, नरेश कांबळे, गटविकास अधिकारी तांगडे, ग्रामसेवक संघटनेचे तालुका अध्यक्ष बाबासाहेब चव्हाण, ग्रामसेवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष डी बी काळे, एन.बी काळे यांच्या सह हजारो महिला व पुरुष उपस्थित होते.

# सिद्धार्थ महाविद्यालयाच्या खो-खो या खेळामध्ये मुलांची विभागीय स्तरावर निवड



**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** येथील क्रीडा व युवक सेवा संचालक महाराष्ट्र राज्य पुणे १ व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जालना तसेच कै. नानासाहेब पाटील विद्यालय नजीक पांगरी यांच्या संयुक्त विद्यमानाने जिल्हास्तरीय खो खो या क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक वाघ सर व उद्घाटक डॉ. सिद्धार्थ कदम राज्य क्रीडा मार्गदर्शक शिव छत्रपती पुरस्कार व डॉ रफिक शेख व प्रा. वाहेद पटेल प्रा. शिवाजी वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती

सर्व खेळाडू जालना जिल्ह्याचे विभागीय पातळीवर नेतृत्व करणार आहे या यशाबद्दल सिल्लोड शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री दादासाहेब मस्के , डॉ. सचिव प्राध्यापक राहुल मस्के, सिद्धार्थ महाविद्यालयाची प्राचार्य डॉ रमेश देशमुख , . उपप्राचार्य डॉ .सुनील मेढे उपप्राचार्य डॉ. श्याम सर्जे सिद्धार्थ कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा विनोद हिवाळे सर व प्रा अमोल चव्हाण सोमनाथ दगडघाटे सिद्धार्थ महाविद्यालयाचे वरिष्ठ व कनिष्ठ प्राध्यापक वृंद शिक्षक कर्मचारी यांनी पुढील क्रीडा स्पर्धेसाठी स्वागत करून शुभेच्छा दिल्या . या सर्व खेळाडूंचे तालुक्यातून व जिल्ह्यातून अभिनंदन व कौतुक होत आहे वरील सर्व खेळाडूं ना मोलाचे मार्गदर्शन व प्रशिक्षण प्रा. उदय वझरकर प्रा. वाहेद पटेल , प्रा. शिवाजी वैद्य यांनी केले.

# सेपाक टाकरा खेळ गावांगावात पोहोचविणार - मंगलाताई पाटील

## जिल्हास्तरीय शालेय सेपाक टाकरा स्पर्धा उत्साहात संपन्न



**जालना । प्रतिनीधी -** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना व जिल्हा क्रीडा परिषद जालना यांच्या वतीने तसेच जिल्हा सेपाक टाकरा असोसिएशन, जालना यांच्या तांत्रीक सहकार्याने आयोजीत जिल्हास्तर शालेय सेपाक टाकरा क्रीडा स्पर्धा २०२५ - २६ जिल्हा क्रीडा संकुल जालना याठिकाणी उत्साहात संपन्न झाल्या.

स्पर्धेच्या उद्घाटीका म्हणुन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या महिला जिल्हाध्यक्षा श्रीमती मंगलाताई पाटील यांची उपस्थिती होती, आपल्या उद्घाटनपर भाषणात श्रीमती पाटील बोलत होत्या, पुढे बोलतांना त्या म्हणाल्या की, सेपाक टाकरा हा अत्यंत चांगला क्रीडा प्रकार असुन जालना जिल्ह्यामध्ये या खेळाचा म्हणावा तसा प्रसार व प्रसार झालेला नाही, परंतु आपण जातीने या खेळात लक्ष घालुन जालना जिल्ह्यातील प्रत्येक गावांमध्ये या खेळाचे खेळाडु निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत, केवळ खेळाडु निर्माण करून थांबणार नाही तर पक्ष प्रमुख अजित दादा पवार, प्रदेश अध्यक्षा रूपालीताई चाकणकर, जालना जिल्हा अध्यक्ष अरविंद अण्णा चव्हाण व पक्ष निरीक्षक श्रीमती वैद्य ताई यांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्याने जालना जिल्ह्याचे खेळाडु राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचवीण्याचे काम आपण करणार आहोत असे ही त्यांनी यावेळी जाहिर केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन रेल्वे युनीयनचे सचिव शेख जावेद, सेपाक टाकरा असोसिएशनचे संस्थापक सचिव शेख चाँद पी.जे., असोएिशनच्या पदाधिकारी श्रीमती शेख महेजबीन, क्रीडा अधिकारी श्रीमती लता लोंढे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी प्रमुख पाहुणे शेख जावेद यांनीही खेळाडुंना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेत जालना, परतुर, मंठा, घनसावंगी या तालुक्यातुन मुलांमुलींच्या तिस संघानी सहभाग नोंदवीला. स्पर्धेत पंच म्हणुन अमोल काटकर, संतोष वाघ, शेख समीर, सोहेल खान, संकेत रोजेकर आदिंनी काम पाहीले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी लांडगे सर, उमेशचंद्र खंदारकर, मोहम्मद यासीन, अमोल सोलाट, जाधव सर, घोष सर, शुभम पवार, रियाज सर, योगीता मॅडम, गायकवाड मॅडम आदिंनी सहकार्य केले.

स्पर्धेचा अंतीम निकाल पुढील प्रमाणे आहे. १४ वर्षाआतील मुले - प्रथम - ऋषी विद्या एजुकेशनल स्कुल, जालना, द्वितीय - जिल्हा परीषद प्रशाला, नेर ता. जि. जालना. १४ वर्षाआतील मुली - प्रथम - जिल्हा परिषद प्राथमीक शाळा, चापडगाव ता. घनसावंगी, द्वितीय - लेट श्री लालचंदजी सकलेचा मेमोरियल इंग्लीश स्कुल, जालना. १७ वर्षाआतील मुले - प्रथम - ऋषी विद्या एजुकेशनल स्कुल, जालना द्वितीय - एम.आर. डी.ए. स्कुल जालना. १७ वर्षाआतील मुली - प्रथम - ऋषी विद्या एजुकेशनल स्कुल, जालना द्वितीय - लेट श्री लालचंदजी सकलेचा मेमोरियल इंग्लीश स्कुल, जालना. १९ वर्षाआतील मुले - प्रथम - ऋषी विद्या एजुकेशनल स्कुल, जालना द्वितीय - जिल्हा परीषद प्रशाला, नेर ता.जि. जालना. १९ वर्षाआतील मुली - प्रथम - लेट श्री लालचंदजी सकलेचा मेमोरियल इंग्लीश स्कुल, जालना.

# जिल्हा उपनिबंधकांच्या मनमानी कारभारास कंटाळून बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांचे आमरण उपोषण



**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जालना यांच्या मनमानी कारभारास कंटाळून बाजार समितीतील अतिरिक्त कर्मचारी अखेर रस्त्यावर उतरले असून, प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात आमरण उपोषण सुरू केले आहे.

मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेल्या आदेशानुसार बदनापूर कृषी उत्पन्न बाजार समितीवर १ कोटी ५ लाख ६९ हजार ८६७ रुपये इतकी संचित तूट नोंदवली गेली आहे. त्यामुळे आर्थिक तुटवड्यामुळे बाजार समितीतील अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे वेतन थकले असून, त्यांच्या उपजीविकेवर गदा आली आहे.

या पार्श्वभूमीवर बदनापूर बाजार समितीचे अतिरिक्त कर्मचारी संजय छबीलवाड, ज्ञानदेव चंद, राहुल तायडे यांनी आपल्या मुळ सेवाजेष्ठतेसह जालना बाजार समितीच्या आस्थापनेवर वर्ग करून घेण्यात यावे, अशी मागणी केली होती.

मात्र या संदर्भात जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जालना संजयकुमार बोराडे यांनी आजवर कोणतीही ठोस कार्यवाही न केल्याने कर्मचाऱ्यांचा संयम सुटला आहे. शिवाय संबंधित अधिकाऱ्यांकडून केवळ टाळाटाळ व उलट टपाली कारवाई सुरू असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे.

यामुळे अखेर तिन्ही कर्मचाऱ्यांनी आजपासून (दि. ६ ऑक्टोबर) जिल्हा उपनिबंधक कार्यालयासमोर आमरण उपोषणास सुरुवात केली आहे.

कर्मचाऱ्यांच्या निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, उपोषणादरम्यान आमचे बरेवाईट झाल्यास अथवा जिवीतहानी झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी कार्यालय अधीक्षक शरद संपतराव तनपुरे, सहाय्यक निबंधक परमेश्वर वरखडे, तसेच जिल्हा उपनिबंधक संजयकुमार बोराडे यांच्यावर राहील. या घटनेने सहकारी क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून, कर्मचाऱ्यांच्या जिवावर आलेल्या संघर्षाकडे शासनाने तातडीने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

स्थानिक सहकारी संघटनांनी आणि कर्मचारी संघटनांनी उपोषणाला पाठींबा दर्शविला असून, उपोषणस्थळी तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रशासनाकडून तत्काळ निर्णय न झाल्यास संघर्ष अधिक तीव्र करण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

# नवरात्र उत्सवानिमित्त गोविंदपाल महाराज यांचा प्रबोधनाचा कार्यक्रम संपन्न



**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** नवयुवक दुर्गा मंडळअवघडराव सावंगी येथे सप्त खंजिरी निर्माते सत्यपाल महाराज यांचे शिष्य सप्त खंजिरी वादक गोविंदपाल महाराज इंगळे प्रबोधनाचा कार्यक्रम संपन्न झाला यावेळी देवेंद्रजी स्वामी चैतन्य महाराज यांचे प्रमुख उपस्थित होते तसेच गावातील महिला पुरुष व बाळ गोपाळ मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी तरुणांचा उत्साह पाहायला मिळाला गोविंद पाल महाराज यांनी तरुणांना खूप मोलाचे मार्गदर्शन केले तरुणांनी व्यसनमुक्त राहुल आपले जीवन आदर्श करण्याचा सल्ला यावेळी गोविंद पाल महाराज यांनी दिला तसेच नवरात्र उत्सवाचे महत्त्व उपासनेचे महत्त्व अध्यात्म आणि विज्ञान याची सांगड घालून लेक वाचवा लेक शिकवा पर्यावरण संवर्धन लग्नातील जुन्या रूढी परंपरा तंटामुक्ती अशा अनेक महत्त्वाच्या विषयावर मार्गदर्शन केले त्यावेळी महाराजा सोबत हार्मोनियम वादक गायक जनार्दन पैठणे तबला वादक उत्तम भारती साथ संगत दीपक नवले संतोष नवले यांनी महाराजांना कार्यक्रमंमध्ये सहकार्य केले देवेंद्रजी स्वामी चैतन्य महाराज यांनी गोविंद पवार महाराज यांचे आभार मानते.

# गोळेगाव येथे टच संस्थेकडून २५२ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**जालना । प्रतिनिधी -** मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. या आपत्तीचा सर्वाधिक फटका बसला तो मुलांच्या शिक्षणाला. वह्या, पुस्तके, शालेय बॅग पाण्यात वाहून गेल्यामुळे शेकडो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक स्वप्न थांबण्याच्या उंबरठ्यावर आले आहे.

अशा पार्श्वभूमीवर TOUCH - Turning Opportunities for Upliftment and Child Help ही संस्था मदतीसाठी पुढे सरसावली आहे. आज परतूर तालुक्यातील गोळेगाव येथे टच संस्थेच्या वतीने तब्बल २५२ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या शैक्षणिक किटमध्ये शालेय बॅग, वह्या, पेन, कंपासपेटी व इतर आवश्यक साहित्याचा समावेश करण्यात आला.

या उपक्रमाबाबत बोलताना टच संस्थेचे समन्वयक उमाकांत पांचाळ म्हणाले, टच संस्थेची मदत म्हणजे केवळ शालेय साहित्य नव्हे, तर ती एका मुलाचे भविष्य उजळवणारी दिवटी आहे. आपल्या छोट्याशा हातभाराने मुलांच्या शिक्षणाचा दिवा पुन्हा प्रज्वलित होतो.

गेल्या ३२ वर्षांपासून ग्रामीण व आदिवासी भागात कार्यरत असलेली टच संस्था शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि बालकल्याण या क्षेत्रांत सातत्याने कार्यरत आहे. या आपत्तीच्या काळातही टच संस्थेच्या ट्रस्टींच्या मार्गदर्शनाखाली व समाजातील दानशूर नागरिकांच्या सहकार्याने मुलांचे शिक्षण खंडित होऊ नये यासाठी हा आपत्ती-कालीन उपक्रम राबविला जात आहे.

गोळेगावमधील ग्रामस्थ व पालकांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत केले. अनेक पालकांच्या डोळ्यात आनंदाश्रू दाटले, कारण त्यांच्या लेकरांच्या शिक्षणाची ज्योत विझणार नाही, याची खात्री त्यांना मिळाली.

या उपक्रमासाठी टच संस्थेचे कार्यकर्ते प्रफुल पालांडे, शिवशंकर शेरे यांनी परिश्रम घेतले. पुढील काही दिवसांत मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील इतर गावांतील विद्यार्थ्यांनाही शालेय साहित्य पुरविण्याचा संकल्प संस्थेने केला आहे.



# राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथे क्रीडा स्पर्धेचे आयोजन



**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथे एक दिवशी क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष संजय लहाने यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच प्रमुख पाहुणे म्हणून नशीब शेख, यश भैया संजय लहाने, पाखरू कुरेशी, रावसाहेब अंभोरे ,साबेर शेख ,रावसाहेब रोकडे, विजय पवार प्रमुख पाहुणे म्हणून यांची उपस्थिती होती कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये प्रामुख्याने जिजाऊ इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल जाफराबाद जिजाऊ इंग्लिश स्कूल वरुड जिजाऊ इंग्लिश स्कूल जवखेडा व राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल टेंभुर्णी या चारही शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले यामध्ये प्रामुख्याने शंभर मीटर धावणे तीन पायाची शर्यत कबड्डी खो-खो हॉलीबॉल रीले रेस आधी खेळांचा खेळानंतर सर्व विद्यार्थ्यांना प्रथम द्वितीय तृतीय व सांघिक खेळात सहभागी विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आलं कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंजुषा बोराडे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.